**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १८ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. भारत - अमेरिका व्यापार समझोता आणि भारत - पाकिस्तान दरम्यान मध्यस्थीसाठी अमेरिकेबरोबर कोणत्याही पातळीवर कधीही चर्चा झाली नव्हती असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं स्पष्ट प्रतिपादन.
2. राष्ट्रीय महामार्गांवर टोल भरण्यासाठी तीन हजार रुपयांचा वार्षिक फास्टॅग पास येत्या १५ ऑगस्टपासून मिळणार.
3. पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय बदलणारं राज्यशासनाचं शुद्धिपत्रक जारी.
4. योग दिनाची तयारी सर्वत्र जोमात, आज नागपुरात जनजागृती रॅली चे आयोजन.

---------------------------------------------

**मोदी-ट्रंप**

भारत-अमेरिका व्यापार समझोता आणि भारत-पाकिस्तान दरम्यान, मध्यस्थीसाठी, अमेरिकेबरोबर कोणत्याही पातळीवर कधीही चर्चा झाली नव्हती असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, अमेरिकेचे अध्यक्ष, डोनाल्ड ट्रंप यांना स्पष्ट सांगितलं आहे.परराष्ट्र विभागाचे सचिव, विक्रम मिसरी यांनी सांगितलं की पंतप्रधान मोदी यांची अमेरिकेच्या अध्यक्षां बरोबर जवळजवळ ३५ मिनिटं, दूरध्वनीवरुन चर्चा झाली. त्यावेळी मोदी यांनी स्पष्ट केलं की भारत-पाकिस्तान दरम्यान, पाकिस्तानच्या विनंतीवरुन थेट सेनादल पातळीवर चर्चा झाली होती.भारतानं आजवर कधीही त्रयस्थांची मध्यस्थी स्वीकारलेली नाही आणि यापुढेही स्वीकारणार नाही. याचा पुनरुच्चार, मोदी यांनी केला. या संभाषणात त्यांनी, ट्रंप यांना ऑपरेशन सिंदूर विषयी माहिती दिली.

---------------------------------------------

**एक्सिऑम-फोर**

भारतीय अंतराळवीर, शुभांशु शुक्ला यांना अंतराळात घेऊन जाणाऱ्या एक्सिऑम-फोर या अंतराळ यानाचं उड्डाण येत्या २२ जूनपर्यंत, पुढं ढकलण्यात आलं आहे. नासा या अमेरिकन अंतराळ संस्थेला, अंतराळ प्रयोगशाळेच्या दुरुस्तीच्या कामाची

तपासणी करायची असल्यानं, हे उड्डाण, पुढं ढकलण्यात आल्याचं, ॲक्सिऑम स्पेस कंपनीनं म्हटलं आहे.नवीन तारीख, उड्डाणासाठीच्या सर्व निकषांची तपासणी करुन, ठरवली असल्याची माहिती, केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री, डॉ.जितेंद्र सिंग यांनी दिली आहे.

---------------------------------------------

योग दिवस

आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभरात, २१ जून रोजी साजरा होणार आहे. यानिमित्त प्राचीन भारतीय संस्कृती पासून ते त्याच्या जागतिक चळवळी पर्यंतचा योगसाधनेच्या प्रवासाचा आढावा घेऊया..

(व्हॉइस बाईट - हेमांगी)

*भारतीय संस्कृतीत एक आध्यात्मिक साधना म्हणून योगसाधनेची सुरुवात झाली. आणि हळूहळू आत्म-साक्षात्काराच्या दिशेने एक शिस्तबद्ध मार्ग म्हणून त्याचा विकास झाला. योगसाधनेचा उगम सुमारे ईसापूर्व ५०० सालादरम्यान झाला. कालांतराने, ही साधना एका समृद्ध शाखेत बहरली. ती वेद, उपनिषद आणि नंतर पतंजलीच्या योग सूत्रांमध्ये प्रवाहित झाली. स्वामी विवेकानंद आणि बी.के.एस. अय्यंगार या योगगुरुंनी १९ व्या आणि २० व्या शतकात योगचे पुनरुज्जीवन केलं. २०१४ मध्ये, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव सादर केला. तेव्हापासून, २१ जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. येत्या शनिवारी साजऱ्या होणाऱ्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" ही आहे. जगभरात यादिवशी योगसाधनेवर आधारित अनेक कार्यक्रम होणार आहेत. योगदिनानिमित्त विशाखापट्टणम इथं होणाऱ्या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत.*

---------------------------------------------

वार्षिक फास्टॅग पास

महामार्गांवरचा प्रवास सुलभ करण्याच्या उद्देशानं येत्या १५ ऑगस्टपासून वार्षिक फास्टॅग पास सुरू करायचा निर्णय, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं घेतला आहे. मंत्री नितीन गडकरी यांनी आज, समाज माध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. तीन हजार रुपये किंमतीचा हा पास एका वर्षाच्या कालावधीसाठी किंवा २०० फेऱ्या यापैकी आधी संपणाऱ्या कालावधीपुरता असेल.

(होल्ड बाईट -३२ सेकंद )

*तीन हजार रुपये में जो पास है साल भर का, उसकी अगर टोल पे किया जाएगा तो उसकी कीमत कम से कम दस हजार से ज्यादा रुपए का टोल देना पड़ता था और ये जो वैलिडिटी है 1 साल में 200 ट्रिप वो क्रॉस कर सकते हैं। इसका फायदा ये होगा कि 200 ट्रिप्स यानी 200 टोल क्रॉस करना होगा और एक टोल क्रॉसिंग की एवरेज कॉस्ट केवल पंधरा रुपये पड़ेगी और मान लीजिए एक टोल पर आप पचास रुपये भी देते हो तो 200 टोल क्रॉस करने पर उसकी कीमत दस हजार होगी, उसके बदले में आपको केवल तीन हजार रुपये में ये पास मिलेगा।*

किरायाच्या वाहनांना ही सुविधा मिळणार नाही. यासाठीची लिंक लवकरच राजमार्ग यात्रा ॲप आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसंच रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध होणार असल्याचंही, गडकरी यांनी सांगितलं.

--------------------------------------------

खरीपाच्या पेरण्या

खरीपाच्या पेरण्यांमध्ये, देशभरात यंदा एक पूर्णांक ४८ शतांश टक्के वाढ झाली आहे. शेती आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं, १३ जून २०२५ पर्यंत, खरीप पिकांच्या पेरणी क्षेत्रात, झालेल्या प्रगतीची आकडेवारी, प्रसिद्ध केली आहे. या आकडेवारीत गेल्या वर्षीच्या तुलनेत, यंदा भाताच्या पेरणीत, ५३ शतांश टक्के वाढ झाली आहे.कडधान्य पेरणीत ४७ शतांश, तेलबिया ५५ शतांश आणि ऊसाच्या पेरणीत २० शतांश टक्केची वाढ झाली आहे. तर तूर पेरणीत, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी, ११ शतांश टक्क्यांची घट झाली आहे.त्याशिवाय भरड धान्य दोन शतांश टक्के आणि कापूस पेरणीत नऊ शतांश टक्के घट झाली आहे. ही आकडेवारी, पत्र सूचना कार्यालयानं, प्रसिद्ध केली आहे.

--------------------------------------------

शुद्धीपत्रक

राज्य शिक्षण मंडळाच्या, मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये, इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना, हिंदी भाषा ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य नाही असं राज्य सरकारनं स्पष्ट केलं आहे.यासंदर्भात सरकारनं, शुद्धी पत्रकात जारी केलं. आता विद्यार्थ्यांना हिंदी ऐवजी, इतर भारतीय भाषा निवडण्याचा पर्याय असून, किमान २० विद्यार्थी, इच्छुक असतील तर, शिक्षक नियुक्ती किंवा ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करता येईल असं, या पत्रकात म्हटलं आहे.राज्यातल्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य असल्याचंही यात स्पष्ट करण्यात आलं आहे.

---

## योग रॅली

जागतिक योग दिना निमित्त नागपूर मनपा, जिल्हा प्रशासन, नागपूर आणि केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमानं, २१ जून रोजी, सकाळी सहा वाजता, धंतोली स्थित यशवंत स्टेडियम इथं कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री अँड.आशिष जयस्वाल यांच्यासह इतर मान्यवर प्रामुख्यानं उपस्थित राहतील.दरम्यान आयुष्य मंत्रालयाच्या, हंड्रेड डेज काउंट डाऊन टू, इंटरनॅशनल योग डे-२०२५ अंतर्गत, जन जागृतीसाठी नागपुरच्या जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाच्या वतीनं, आज सकाळी सात ते साडेआठ दरम्यान, भव्य योग रॅलीचं आयोजन करण्यात आलं.ही रॅली नरेंद्रनगर येथील, वीर हनुमान मंदिरातून सुरू होऊन, रिंगरोड, मानेवाडा चौक, बेसा रोड, मनीष नगर, बेलतरोडी रोड, शताब्दी चौक मार्गे, पुन्हा नरेंद्रनगर इथं परतली.यात सुमारे ५०० योगसाधक आणि साधिकांनी दुचाकी तसंच चारचाकी वाहनांसह, उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सहभागी सदस्यांनी भगवे झेंडे, योग दिनाचे फलक आणि जनार्दन स्वामींच्या जय घोषाद्वारे वातावरण योगमय केलं.तसंच लाऊडस्पीकर द्वारे जनजागृतीपर माहितीही देण्यात आली.

---

## हवामान

आगमि काही तासात, विदर्भातील वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये, काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळ आणि विजांच्या कडकडाटासह, हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, नागपूर या जिल्ह्यांमध्ये, काही ठिकाणी सोसाट्याचं वादळ आणि विजांच्या कडकडाटासह, हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

---

## धरती आबा

भगवान बिरसा मुंडा यांच्या 150व्या जयंतीचं औचित्य साधून, जनजातीय गौरव वर्षानिमित्त, केंद्र सरकारनं आदिवासी समुदायांना सक्षम करण्यासाठी दोन महत्त्वपूर्ण आणि कालबध्द कार्यक्रम हाती घेतले आहेत. यात एकत्रित प्रयत्नांचा भाग म्हणून, 'धरती आबा अभियान-एक केंद्रित जागरूकता आणि संपृक्तता मोहीम' तसंच 'धरती आबा कर्मयोगी-एक क्षमता बांधणी कार्यक्रम' या दोन अभियानाद्वारे लक्षित

**बहुक्षेत्रीय सेवा, वितरणासाठी एक मोठी मोहीम आखलेली आहे.आदिवासी भागांमध्ये पायाभूत सुविधांची परिपूर्णता सुनिश्चित करणे या उपक्रमांचा उद्देश असून, याची सुरवात चंद्रपूरचे जिल्हाधिकारी, विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते, हिरवी झेंडी दाखवून काल करण्यात आलं.**

**--------------------------------------------**

**क्रिकेट**

**इंग्लंड विरोधात होणाऱ्या कसोटी क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघात जलदगती गोलंदाज हर्षित राणा याचा राखीव खेळाडूंमधे समावेश झाला आहे. बी.सी.सी.आय. अर्थात भारतीय क्रिकेट, नियामक मंडळानं काल रात्री ही घोषणा केली. हर्षित राणानं, ऑस्ट्रेलिया विरुद्ध कसोटी क्रिकेटमधे पदार्पण केलं होतं. त्याने आतापर्यंत दोन कसोटी, पाच एक दिवसीय आणि एक, टी-ट्वेंटी सामना खेळला आहे.इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघाचं नेतृत्व, शुभमन गिल करणार असून, संघात ऋषभ पंत, यशस्वी जायसवाल, के.एल.राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यु ईश्वरन, करुण नायर, नितीश रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल, वाशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकुर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, अर्शदीप सिंह आणि कुलदीप यादव यांचा समावेश आहे.**

**--------------------------------------------**